## निवडक

### बांबोळी येथे १० एप्रिलपासून गोवा व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य प्रदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २६ : कारखाने आणि बॉयलर्स निरीक्षक कार्यालयाने दि. १० ते दि. १२ एप्रिल रोजीपर्यंत बांबोळी येथील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम येथे गोवा व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य प्रदर्शन २०२५ चे आयोजन केले आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाचे ज्ञान आणि उपाय योजनावर चर्चा करणे, आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञान, उपकरणे आणि उपायांचे प्रदर्शन आणि नवीन सुरक्षा धोरण आणि सुधारणांसाठी समर्थन करणे, व्यावसायिकांमध्ये सार्वजनिक सुरक्षा आणि जागरूकता वाढविणे, सुरक्षा उपायांविषयी आव्हाने ओळखणे हे तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. प्रतिनिधी आणि अतिथी म्हणून नोंदणीसाठी, हींींि:/ /.सेरीहर्शुींींाळीं.लो

---

### फोंडा भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २६ : फोंडा जोफिलनगर ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २८ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सेसा अपार्टमेंट आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे फोंडा सिल्वानगर ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. २९ रोजी सकाळी ९ ते संध्या २ वाजेपर्यंत सिल्वानगर आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### डिचोली भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २६** : टीआयपी कॉलनी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २८ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत टिप कॉलनी, बायपास मुळगाव, तांबद्रस्ता आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे डिचोली विनयनगर, साळकर कॉलनी आणि वेताळ मंदिर डीटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवारी दि. २९ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी २ वाजेपर्यंत तांबद्रस्ता, विनयनगर, साळकर कॉलनी, शिरोडवाडी, मुळगाव आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या रस्ते अपघातांचा अहवाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २६** : वाहतूक संचालनालयाने जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या अपघातांची आणि जारी केलेल्या चलनांचा मासिक अहवाल तयार केला आहे. अहवालानुसार, २११ रस्ते अपघात झाले, त्यापैकी २२ प्राणघातक अपघात (उत्तर गोवा-१२ आणि दक्षिण गोवा -१०), २८ गंभीर अपघात (उत्तर गोवा-१४ आणि दक्षिण गोवा-१४), ४४ किरकोळ अपघात (उत्तर गोवा-१५ आणि दक्षिण गोवा-२९) आणि ११७ दुखापत न झालेले अपघात (उत्तर गोवा-५९ आणि दक्षिण गोवा-५८) होते.

रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांची एकूण संख्या २३ (उत्तर गोवा-१२ आणि दक्षिण गोवा-११), ३० लोक गंभीर जखमी (उत्तर गोवा-१७ आणि दक्षिण गोवा-१३), तर ६८ जणांना किरकोळ दुखापत झाली (उत्तर गोवा-२९ आणि दक्षिण गोवा-३९). मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये ११ चालक (उत्तर गोवा ६ आणि दक्षिण गोवा-५), ४ मागे बसलेले (उत्तर गोवा-१ आणि दक्षिण गोवा-३), १ चालक (दक्षिण गोवा) आणि ४ पादचारी (उत्तर गोवा-४) आणि २ प्रवासी (दक्षिण गोवा-२) यांचा समावेश आहे.

---

### नवीन मांडवी पूल आजपासून वाहतूकीस बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २६** : नवीन मांडवी पूल हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण, सुरक्षा उपाय आणि पुलाचे रंगकाम करण्यासाठी गुरुवार दि. २७ ते शनिवार दि. ५ एप्रिल रोजीपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. १२ टनांपर्यंतची वाहने जुन्या मांडवी पुलावरून आणि १२ टनांपेक्षा जास्त वजनाची वाहने अटल सेतू पुलावरून वळविण्यात येईल.

---

### साखळीत शनिवारी 'चैत्रपालवी

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २६** : रवींद्र भवन साखळीच्यावतीने गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला शनिवार दि. १९ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता 'चैत्रपालवी' हा मराठी गीतांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये संज्योती जगदाळे (पुणे), श्रुती जोशी (पुणे), नवाब शेख (गोवा) व मैत्री नाईक गीते सादर करतील, त्यांना नितीन कोरगावकर (तबला), बाळकृष्ण मेस्त (सिंथेसायझर), अश्विन जाधव (ऑक्टोपॅड), तारानाथ होलेगद्दे (तालवाद्य) व रोहित खांडोळकर (संवादिनी) हे साथसंगत करतील. प्रा. श्रिया टेंग्से यांचे निवेदन असेल.

# कोलवा खाडीचे प्रदूषण गंभीर

## स्थानिक संतप्त | पर्यटक आणि स्थानिकांच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २६** : गोव्यातील प्रसिद्ध कोलवा बीचजवळील कोलवा खाडी सध्या गंभीर प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. अनेक वेळा उपाययोजनांची मागणी करूनही येथे काळा गाळ, कचरा आणि सांडपाणी मोठ्या प्रमाणावर साचले असून, यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्यासोबतच पर्यटक आणि स्थानिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

बुधवारी समुद्रकिनाऱ्याच्या पाहणीत खाडीमध्ये सांडपाणी, प्लास्टिकच्या बाटल्या आणि अन्य कचऱ्याची मोठ्या प्रमाणावर भर पडलेली आढळली. हे प्रदूषण कोलवा बीचच्या निसर्गसौंदर्याला गालबोट लावत असून, पर्यटकांमध्येही याबाबत नाराजी वाढत आहे.

खाडीच्या बिघडत्या स्थितीमुळे स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणप्रेमी नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. पर्यटन विभाग आणि गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. नियमित स्वच्छता आणि प्रदूषण नियंत्रणासाठी वारंवार मागणी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिक आमदार वेंझी व्हिएगस यांनीही हा मुद्दा वारंवार विधानसभेत मांडला आहे, मात्र सरकारकडून कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. नागरिकांनी जलसंपदा विभागाकडे तात्पुरत्या उपाययोजनांची मागणी केली असली, तरी खाडीचे प्रदूषण कायम असून, त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे.



कोलवा नागरी आणि ग्राहक मंचाच्या संयोजिका ज्युडिथ आल्मेडा यांनी या प्रदूषणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. खाडीमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा साचला आहे. यापूर्वी आम्ही प्रशासनाला कचरा अडवण्यासाठी नेट बसवण्याचा सल्ला दिला होता, पण अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असे त्यांनी म्हटले.

त्यांनी प्रशासनावर टीका करताना असेही नमूद केले की, प्रदूषण नियंत्रण मंडळाने काही कारणे दाखवा नोटिसा बजावल्या असल्या तरी प्रत्यक्षात कोणतीही कठोर कारवाई झालेली नाही. खाडी पूर्णतः प्रदूषित झाली असून, जबाबदार अधिकारी त्यांच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करत आहेत, असे आल्मेडा म्हणाल्या.

स्थानिक रहिवासी सिमाओ रॉड्रिग्स यांनीही अधिकाऱ्यांच्या निष्क्रीयतेबद्दल नाराजी व्यक्त केली. कोलवा बीचच्या सौंदर्याला गालबोट लागले आहे. अधिकाऱ्यांना परिस्थितीची पूर्ण कल्पना असूनही ते नियमित स्वच्छता करण्यास अपयशी ठरत आहेत,असे त्यांनी सांगितले. स्थानिक व्यावसायिकांवर या प्रदूषणासाठी दोषारोप ठेवण्याचे प्रकार सुरू असले तरी, ते जबाबदार नसल्याचा दावा काही व्यावसायिकांनी केला आहे. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे.

स्थानिक आमदार वेंझी व्हिएगस यांनी सरकारच्या भूमिकेवर टीका करताना सांगितले की, त्यांनी हा मुद्दा वारंवार विधानसभेत मांडला असला तरी प्रशासनाने यावर गांभीर्याने विचार केलेला नाही. प्रदूषण नियंत्रणासाठी ठोस पावले उचलली गेली पाहिजेत, अन्यथा कोलवा खाडीचे संपूर्ण परिसंस्थाच धोक्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

कोलवा खाडीच्या प्रदूषणाने पर्यावरणासह स्थानिक अर्थव्यवस्थेलाही फटका बसण्याची शक्यता आहे. पर्यटन हा गोव्याचा मुख्य आर्थिक कणा असल्याने, कोलवा बीच आणि खाडीचे स्वच्छतेसाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा, जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या या पर्यटनस्थळाचे महत्त्व कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# मासेमारी बंदीचा कालावधी वाढवण्यास गोव्यातील बोट मालकांचा सशर्त पाठिंबा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २६ :** भारतीय मत्स्य सर्वेक्षण विभाग, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाने १ जून ते ३१ जुलै या कालावधीतील मासेमारी बंदी १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावावर विचार सुरू केला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्वात मोठ्या मासेमारी केंद्रांपैकी एक असलेल्या कुटबण फिशिंग जेट्टीवरील बोट मालकांनी या प्रस्तावाला सशर्त पाठिंबा दर्शविला आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने मासेमारी बंदी ६१ दिवसांवरून ७६ दिवसांपर्यंत वाढवण्याबाबत मत्स्यव्यवसायाशी संबंधित भागधारकांचे मत मागवले होते. यानुसार, कुटबण बोट मालक संघटनेच्या वतीने झालेल्या बैठकीत, मासेमारी बंदी १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यास सहमती दर्शविण्यात आली. मात्र, महासंघाने दोन महत्त्वाच्या अटींची पूर्तता केल्यासच या प्रस्तावास पाठिंबा दिला जाईल, असे स्पष्ट केले. मात्र मासेमारी बंदी संपूर्ण पश्चिम किनारपट्टीवर गुजरातपासून केरळपर्यंत समान पद्धतीने लागू करावी आणि मासेमारी बंदीच्या कालावधीत दुहेरी इंजिन असलेल्या देशी मासेमारी नौकांना समुद्रात उतरण्यास बंदी घालावी अशा दोन अटी महासंघाने ठेवल्या आहेत.

कुटबण मत्स्यपालन संस्थेचे अध्यक्ष सॅव्हियो डिसिल्वा यांनी सांगितले की, या मुद्यावर मत्स्यव्यवसाय संचालकांकडून आलेल्या निवेदनावर चर्चा करण्यासाठी आपत्कालीन बैठक बोलावण्यात आली होती. पर्ससीन आणि इतर मासेमारी नौकांच्या मालकांनी मासेमारी बंदीच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास संमती दर्शविली आहे, परंतु ती फक्त वरील दोन अटींच्या पूर्ततेनंतरच लागू असावी, असे डिसिल्वा यांनी स्पष्ट केले.

पर्ससीन मासेमारी नौकांचे मालक सेबॅस्टियन कार्डोझो यांनीही महासंघाच्या भूमिकेचा पुनरुच्चार करत सांगितले की, कुटबण बंदरातून मासेमारी करणाऱ्या नौकांच्या मालकांनी या प्रस्तावास पाठिंबा दिला आहे. मात्र, मासेमारी बंदी संपूर्ण पश्चिम किनारपट्टीवर एकसारखी लागू असावी आणि बंदी कालावधीत दुहेरी इंजिनसह मोटार नौकांना परवानगी दिली जाऊ नये. वाढीव बंदीच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवल्या जाण्याचीही आवश्यकता आहे.

पारंपरिक मच्छीमार पंढरीनाथ यांनीही सरकारच्या प्रस्तावाचे स्वागत केले. ही एक चांगली संकल्पना आहे, परंतु अपेक्षित परिणाम मिळवण्यासाठी संपूर्ण देशाच्या पश्चिम किनारपट्टीवर मासेमारी बंदी एकसारखी असणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

मत्स्यव्यवसाय विभागाला भारत सरकारच्या मत्स्य सर्वेक्षण विभागाकडून १० मार्च रोजी एक पत्र प्राप्त झाले असून, त्यामध्ये १ जून ते ३१ जुलै दरम्यान लागू असलेली मासेमारी बंदी १ जून ते १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्याबाबत सर्व सागरी राज्य सरकारांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, असे सांगण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने मत्स्य व्यवसायाशी संबंधित भागधारकांकडून यासंदर्भात प्रतिसाद मागविला आहे. त्यामध्ये, प्रस्तावित मुदतवाढीस सहमती आहे का, तसेच बंदी कालावधी वाढवण्यात काही अडथळे असतील तर ते स्पष्ट करण्यास सांगण्यात आले आहे.

अनेक बोट मालकांनी सांगितले की, अलीकडील हवामान स्थिती आणि चक्रीवादळांच्या वाढत्या घटनांमुळे १ ते १५ ऑगस्ट दरम्यान मासेमारी करणे शक्य होत नाही. तसेच, ओडिशा, झारखंड, छत्तीसगड आणि इतर राज्यांतून येणाऱ्या स्थलांतरित कामगारांच्या विलंबित आगमनामुळे या काळात नौकाचालकांना अडचणी येतात. त्यामुळे १५ ऑगस्टपर्यंत बंदी वाढविण्याचा निर्णय काही प्रमाणात लाभदायक ठरू शकतो, असे त्यांचे म्हणणे आहे.

सध्या हा प्रस्ताव चर्चेच्या टप्प्यात असून, भारत सरकार आणि सागरी राज्य सरकारे यावर अंतिम निर्णय घेतील. गोव्यातील मासेमारी समुदायाने मात्र त्यांचे मत स्पष्टपणे मांडले असून, सरकारने त्यावर विचार करावा अशी त्यांची अपेक्षा आहे.

# कोलवा बीचवरील कचरा संकलन केंद्रामुळे आरोग्यास धोका

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २६** : कोलवा बीचजवळील कचरा संकलन केंद्र स्थानिक रहिवाशांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. या केंद्रामुळे परिसराच्या सौंदर्यावर परिणाम होत असून, त्याच्या त्वरित स्थलांतराची मागणी जोर धरू लागली आहे.

स्थानिक नागरिकांच्या तीव्र विरोधासह, प्रशासनाने हे केंद्र कायमस्वरूपी कचरा संकलन केंद्र म्हणून वापरण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या ठिकाणी योग्य व्यवस्थापनाचा अभाव असल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी आणि हवेच्या प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, ज्याचा थेट परिणाम कोलवा बीचच्या पर्यावरणावर होत आहे.

पर्यटक आणि स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात नाराजी व्यक्त केली आहे. कचऱ्याचा ढीग वाढत असल्याने परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून, कचरा वेचण्यासाठी ट्रक येईपर्यंत हा कचरा जागेवरच तसाच पडून राहतो.

याठिकाणी केलेल्या पाहणीत असे आढळून आले की, ओला आणि सुका कचरा एकत्र टाकला जात आहे. हे योग्य कचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने गंभीर आहे. या केंद्रावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याने माहिती देताना सांगितले की, जवळील शॅक्स आणि इतर व्यावसायिक आस्थापनांतून कचरा गोळा करून येथे टाकला जातो.

या अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला ओला आणि सुका कचरा एकत्र टाकला जात असला तरी, नंतर प्रक्रिया केंद्रात जाऊन त्याचे वर्गीकरण केले जाते. मात्र, पर्यावरणप्रेमींनी यावर आक्षेप घेत प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

कोलवा सिव्हिक अँड कन्झ्युमर फोरमच्या अध्यक्षा ज्युडिथ अल्मेडा यांनी प्रशासनावर टीका करत म्हटले की, रोज शेकडो पर्यटक कोलवा बीचला भेट देतात, आणि बीचच्या जवळच कचऱ्याचा ढीग असल्याने पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे. प्रशासनाने अधिक सुयोग्य ठिकाणी हे केंद्र हलवले पाहिजे, पण या सौंदर्याला बाधा येत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. कोलवा ग्रामपंचायतीच्या सरपंच सुझी फर्नांडिस यांनीही ही चिंता व्यक्त करत सांगितले की, पर्यटन विभाग शॅक्समधील कचरा संकलन नियमित करत असला तरी सध्याचे संकलन केंद्र योग्य नाही. त्या पुढे म्हणाल्या की ग्रामपंचायतीने या कचरा संकलन केंद्रास मंजुरी दिली नाही. तसेच, हे केंद्र पर्यटन विभागाच्या अखत्यारीत येते. स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणप्रेमी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत असून, कचरा संकलन केंद्राच्या तातडीने स्थलांतराची मागणी करत आहेत.



# दारूचा बार बंद करून वाचनालयाची स्थापना

- आदर्श शिक्षकाचा आदर्श पायंडा
- पंचक्रोषीतून कौतुकाचा वर्षाव

संतोष नाईक
■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २६** : ओकांब -धारबांदोडा येथील रहिवासी आणि पेशाने शिक्षक असलेल्या डॉ. उदय गावकर यांनी समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले आहे. त्यांनी आपल्या वडिलोपार्जित दारूचा बार बंद करून त्या जागेचे रूपांतर वाचनालयात केले, जे समाजात ज्ञानप्रसाराचे मंदिर ठरणार आहे.त्यांच्या या कृतीमुळे संपूर्ण गावात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

बहुतेक शिक्षक विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी आणि आदर्श जीवनशैलीचे धडे देतात, मात्र डॉ. उदय गावकर यांनी केवळ सल्ले देण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर आदर्श उभा केला. ग्रामस्थ आणि स्थानिक प्रशासनाकडून या उपक्रमाचे भरभरून कौतुक करण्यात आले. धारबांदोरा गावचे सरपंच बालाजी गवस यांनी वाचनालयाच्या उद्घाटनप्रसंगी ग्रामस्थांच्या वतीने डॉ. उदय गावकर यांचे अभिनंदन केले. बार बंद करून समाजहितासाठी वाचनालय स्थापन करण्याचा त्यांचा निर्णय हा इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे त्यांनी नमूद केले. डॉ. उदय गावकर हे गेल्या ३५ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून, मुख्याध्यापक, प्राचार्य आणि शिक्षण उपसंचालक या महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम पाहिले आहे. समाजाने त्यांना मान-सन्मान दिला, त्यामुळे समाजासाठी काहीतरी भरीव योगदान देणे ही आपली जबाबदारी आहे, असे त्यांना नेहमीच वाटत होते.

गावाच्या परिसरात अनेक दारूची दुकाने वाढत असल्याचे त्यांनी पाहिले, ज्यामुळे अनेक कुटुंबे उद्धवस्त होत होती. व्यसनाधीनतेमुळे विद्यार्थी आणि युवा पिढीचे भवितव्य धोक्यात येत होते. एक शिक्षक म्हणून समाजाला व्यसनमुक्त जीवनशैलीकडे वळवण्याचे आपले कर्तव्य आहे, असे मानत त्यांनी बार आणि रेस्टॉरंट बंद करण्याचा निर्णय घेतला.



बार बंद केल्यानंतर त्यांनी विचार केला की, त्या जागेचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी कसा करता येईल? शिक्षण आणि ज्ञानाचा प्रचार हा त्यांचा ध्यास असल्याने, वाचनालय सुरू करणे हीच सर्वोत्तम कल्पना ठरली.

डॉ. उदय गावकर यांचे योगदान केवळ शिक्षण क्षेत्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी यश प्रॉडक्शनच्या माध्यमातून गोव्यातील अनेक कलाकार घडवले आहेत. समाजासाठी आणखी काही करण्याची गरज असल्याची जाणीव त्यांना नेहमीच होती, त्यामुळे वाचनालयाच्या स्थापनेसाठी त्यांनी पुढाकार घेतला.

त्यांचे जिवलग मित्र प्रा. नामदेव नाईक यांनीही त्यांच्या या कार्याचे भरभरून कौतुक केले. उदय हे विविध कलाक्षेत्रांमध्ये कार्यरत असून, समाजहिताचा विचार त्यांच्या प्रत्येक उपक्रमामध्ये दिसून येतो. बार बंद करून वाचनालय सुरू करणे हे समाजाला दिलेले मोठे योगदान आहे, असे त्यांनी सांगितले.

सरपंच बालाजी गवस यांनीही डॉ. उदय गावकर यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करताना सांगितले की, आज आमच्या गावात एक ऐतिहासिक घटना घडत आहे. एका व्यक्तीने स्वतःच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेला बार बंद करून वाचनालय सुरू केले. हे समाजासाठी एक मोठे उदाहरण आहे. यामुळे नवीन पिढीला प्रेरणा मिळेल. शिक्षक म्हणून सामाजिक परिवर्तन घडवण्याची ताकद असते, याचे ज्वलंत उदाहरण डॉ. उदय गावकर यांनी साकारले आहे. त्यांच्या या समाजहितैषी कार्यामुळे संपूर्ण धारबांदोडा परिसरात त्यांच्याविषयी आदर आणि प्रेरणेची भावना निर्माण झाली आहे.

# बेकायदा बांधकामांबाबत निर्णय घेण्यापूर्वी तपासणी करणार : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २६** : गोव्यातील बेकायदा बांधकामांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य सरकार आवश्यक ती सर्व तपासणी करणार असल्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी विधानसभेत स्पष्ट केले. पंचायत संचालनालयाने जारी केलेल्या निवेदनाची पडताळणी करण्यात येईल, तसेच ६ मार्च २०२५ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सभागृहात आश्वासन दिले.

मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील नाजूक परिसंस्थेचे रक्षण करण्याच्या दृष्टीने बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, नगरपरिषद, पणजी महापलिका आणि ग्रामपंचायतींना आपापल्या हद्दीतील रस्ते, महामार्ग आणि प्रमुख भागांतील अनधिकृत बांधकामांची तपासणी करून चार आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. यासंदर्भात, १३ मार्च रोजी पंचायत संचालनालयाने ग्रामपंचायती, गट विकास अधिकारी (बीडिओ) आणि पंचायत सचिवांना पत्र पाठवून टप्प्याटप्प्याने कारवाईचे निर्देश दिले.

बेकायदा बांधकामांची ओळख पटवण्यासाठी त्यांना आठ वेगवेगळ्या श्रेणींत वर्गीकृत करण्यात आले आहे, ज्यामध्ये राष्ट्रीय महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे, रस्त्याच्या कडेला उभारलेली बांधकामे, महापालिका आणि पंचायत क्षेत्रातील व्यावसायिक इमारती, तसेच सरकारी व कोमुनिदाद जमिनीवरील अनधिकृत संरचना यांचा समावेश आहे.

राज्य सरकारकडून या बांधकामांचे सर्वेक्षण हाती घेण्यात आले असून, त्याच्या अंमलबजावणीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे नागरिकांमध्येही अस्वस्थता वाढली असून, विशेषतः ज्या भागांमध्ये जमिनीच्या नोंदी संदर्भात वाद निर्माण झाले आहेत, तेथे मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

विधानसभेत विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित करत मुख्यमंत्र्यांनी यावर स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी केली. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री सावंत यांनी संबंधित परिपत्रक तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशांचा सविस्तर आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले.

**VILLAGE PANCHAYAT DONGURLI - THANE SATTARI, GOA**

Ref. No. VPDT / SATT / ADM / 24-25 / 1835
Date : 12.03.2025

**Advertisement for inviting application for post of LDC (Lower Division Clerk)**

Village Panchayat Dongurli Thane, Sattari, Goa invites application from the eligible candidate stating full name address, age with date of birth, educational qualification, employment exchange number, residence certificate for 15 years in Goa, along with attested copies of all certificate for post of Lower Division Clerk (01 No.) Group "C" on regular basis.

**Sr. No.** 1, **Name of Post:** V. P. Clerk / Lower Division Clerk, **Age:** Between 18 to 40 Years and shall be relaxed to person belonging to the SC / ST / OBC and Govt. Servants by five years in accordance with the instructions issued by the Govt., **No. of Post:** 01, **Pay Scale:** PB-I , 5200 -20200+ Rs. 1900/- as Grade Pay, **Educational Qualification:** i) Essential Qualification a) H.S.S.C or equivalent from recognized Board and typewriting in English with minimum speed of 30 words per minute and having computer knowledge (b) Knowledge of Konkani, ii) Desirable a) Knowledge of Marathi

- Candidate shall be the resident of the State of Goa and residing preferably within Panchayat area or nearby area for more than 15 years.
- Application should reach to this office by 15/04/2025 before 4.00 p.m.
- Incomplete application in any manner and application received beyond the prescribed date & time are liable to be rejected summarily by the Authority.
- Valid eligible candidates will be called for the written examination through call letter.
- Panchayat reserves the right to cancel the recruitment process at any time without giving any further notice and without assigning any reason thereof.

Seal
Sd/- **Nilesh S. Parwar (Sarpanch)**
**V. P. Dongurli - Thane, Sattari**